# परमपिता परमात्म्याचे दिव्य नाव आहे 'शिव'

भारतात सर्वत्र महाशिवरात्री मोठ्या भक्तिभावाने साजरी केली जाते. महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्व अनन्य साधारण असे आहे. भगवान शिवासबंधी चर्चा करत असतांना एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे आठवते. भारतामध्ये वेग-वेगळया स्थानावरील 'शिवलिंग' नावामध्ये जी प्रतिमा बनली आहे त्याला या ठिकाणी येणारे विदेशी सुध्दा पाहतात आणि भारतातील बहुसंख्य लोक त्याची पुजा सुध्दा करतात. पण ते या प्रतिमेचे वेगळे रूप पाहून आणि याचे 'त्रिभुवनेश्वर','मुक्तेश्वर','पापकटेश्वर' इत्यादी नावे ऐकून हा विचार करत नाहीत की ही निराकार, विचित्र (ज्यास चित्र नाही अशी) प्रतिमा कुणाचे स्मरणचिन्ह आहे. एका उदाहरणाद्वारे या गोष्टीला स्पष्ट करणे अधिक चांगले राहील.

समजा, दिल्लीमध्ये आपण एका बस किंवा पर्यटनवाहना मध्ये यात्रा करत असू तर पाहावयास मिळेल की बसचा कंडक्टर स्टॉप आल्यावर मोठया आवाजात सांगेल की - ''किंग एडवर्ड पार्क!, टिळक ब्रिज!, राजघाट! अथवा गांधी समाधी !!'' 'एडवर्ड पार्क'चे नाव ऐकल्यानंतर सर्व यात्रेकरू समजतात की इंग्लडचा सम्राट एडवर्डचा या ठिकाणी पुतळा असेल किंवा ही बाग एडवर्डच्या स्मृतीमध्ये बनवण्यात आले असेल. 'टिळक ब्रिज' - हे नाव ऐकून सुध्दा मनामध्ये ही स्मृती येते की टिळक गीता प्रेमी होते, त्यांनी गीतेवर एक विद्वत्तापुर्ण टिका केली होती आणि देशाच्या स्वातंत्र्य-संग्रामामध्ये विशेष भाग घेतला होता. अशाच प्रकारे.'राजघाट' ह्या 'गांधी समाधी' चे नाव ऐकल्या बरोबर माणसांच्या मनामध्ये हे येते की गांधीजी स्वतंत्रता-संग्रामाचे प्रमुख नेता होते किंवा एक अग्रणी सेनानी होते ज्यांना 'बापूजी' नावाने सुध्दा लोक बोलवत असत आणि त्यांना 'राष्ट्रपिता'ची उपाधी सुध्दा देण्यात आलेली आहे.

आता या उदाहरणावरून विचार करा की, आज कोणी विदेशी किंवा भारतीय कुठल्याही मंदिरामध्ये शिवलिंग नावाची प्रतिमा पाहातात तेव्हा, त्यांच्या मनामध्ये कुठला दिव्य इतिहास आठवत असेल? काय ते समजतात की, शिवाने भारताला दु:ख व अशांती पासून केव्हा स्वतंत्रता दिली होती ज्याला 'मुक्तेश्वर' म्हटले जाते? त्यांनी कुठल्या प्रकारे सर्वांचे कल्याण केले होते की, लोक 'शिव' नावाने आठवण करतात? विचार केल्यानंतर आपण या निर्णयावर पोहचाल की, लोकांच्या स्मृतीपटलावर शिवलिंगा संबधी काहीही स्पष्ट माहिती किवा इतिहासातील प्रसंग समोर नाहीत. जेव्हा लोक सरदार पटेल, शिवाजी महाराज, महात्मा गांधी,लोकमान्य टिळक इत्यादींचे पुतळे पाहतात तर ते त्यांना प्रसिध्द इतिहासकालीन व्यक्ति मानतात आणि चटकन त्याच्या प्रतिमेतून त्यांच्या पुतळयाला ओळखतात आणि त्यांचे कर्तव्य पण आठवले जाते. परंतू शिवलिंगाची काही दैहीक आकृती तर नाही आणि न की त्यांचा काही इतिहास माहिती आहे. त्यामुळे शिवासंबंधी काहीही स्पष्ट जाणत नाहीत.

आपण पाहतो की,जेव्हा टुरिस्ट गाईड यात्रेकरूंना दिल्ली येथील राजघाट, कुतूब मीनार, आगरा आणि ताजमहाल इत्यादी स्थानावर घेऊन जातात तर ते त्यांना संबंधीत व्यक्ती बद्दल महत्वपूर्ण आणि रसाळ इतिहास यात्रेकरुंना सांगत असतात. आता ते, हे समजत असते तर शिवलिंग कोणत्या श्रेष्ठ मान्यवराची प्रतिमा किंवा महान पुतळा आहे आणि 'अमरनाथ', 'सोमनाथ', 'मुक्तेश्वर', 'त्रिभुवनेश्वर' इत्यादी नावे का दिली गेली आहेत? तर ते अनेक सर्व स्मरण स्थळे किंवा स्मारके याच्याही आगोदर तर देशी व विदेशी यात्रेकरुंना शिव समाधी अर्थात शिवलिंगाच्या जवळ घेऊन गेले असते आणि त्याची महत्वपूर्ण आणि कल्याणकारी माहीती दिली असती. परंतू

शिवाचा परीचय करून देणारा कोणीही टुरिस्ट किंवा गाईड ही नाही. शिवाची प्रतिमा प्रथमत: कोणी स्थापन केली, शिवरात्रीचा उत्सव का साजरा केला जातो, शिवाचे विशेष  कोणते कर्तव्य आहे? इत्यादी गोष्टीवर तर कोणी सुध्दा विवेक-पूर्ण प्रकाश टाकत नाही. म्हणूनच तर आज बहुतांश थोडेच लोक महाशिवरात्री साजरी करतात.

**'परमात्मा शिवाच्या परिचयाची का अवश्यकता आहे?'**

शिवाची महिमा करते वेळी लोक गायनाच्या रूपामध्ये म्हणत असतात - 'तुम्ही हो माता,पिता तुम्ही हो, तुम्हीं हो बन्धु,सखा तुम्ही हो....' असा प्रश्न निर्माण होतो की, काय सर्व सम्बंध त्याच्याशी कसे असतील? मग भक्त लोक म्हणतात - 'ओम् नमो शिवाय....' यावरून स्पष्ट होते की शिव काही सामान्य रूपाने आमचा पिता नाही परंतू तो तर सर्वांचा परमपूज्य, परमपिता आहे. समजा कोणी छोटा मुलगा आपल्या वडिलांच्या बरोबर शिवमंदिराच्या जवळून जात असेल आणि मुलाने शिवमंदिराकडे बघून इशारा करत विचारले की - ' पिताजी, हे काय आहे?' तर वडील उत्तर देतील - 'ही भगवानाची प्रतिमा आहे. त्यासमोर आपले डोके टेकव!' परंतु ज्या ईश्वराला 'त्वमेव माताच् पिता त्वमेव.... म्हटले जाते, त्याचे जीवन चरित्र न समजणे ही किती विचीत्र गोष्ट आहे! लौकीक मात-पित्याचा परिचय तर सर्वांना असतो, परंतु ज्या पित्याच्या नावाला 'मुक्तेश्वर','पापकटेश्वर','त्रिभुवनेश्वर' इत्यादी नावाने संबोधतात त्याला न ओळखने ही किती मोठी चुक आहे!

**'शिव नाव कुणाचे आहे आणि शिवलिंग कुणाची प्रतिमा आहे?'**

आपण जाणता की, शिवाला 'स्वयंभू' सुध्दा म्हणतात कारण शिवाला कोणी जन्म दिलेला नाही, परंतू तो अनादि आहे. त्यांच्या स्मरणार्थ ,'त्वमेव माताच पिता त्वमेव....' म्हणतात.  इत्यादी शब्दावरून स्पष्ट होते की ते सर्व आत्म्यांचे माता-पिता आहेत,त्यांचे कोणी माता-पिता वा जन्म देणारे नाहीत. शिव 'त्रिभुवनेश्वर' आहे, तिन्ही लोकांचे ते मालक आहेत, त्यांच्यापेक्षा कोणी मोठा नाही जे की त्यांचे नामकरण करतील. तेव्हा जो जन्म सुध्दा घेत नाही, ज्यांचे मात-पिता सुध्दा नाहीत, त्यांचे नाव आम्ही मनुष्याप्रमाणे व्यक्तिवाचक किंवा संज्ञावाचक तर ठेऊ शकत नाही. आम्हा मानवाचे नावे तर दैहिक जन्म घेतल्यावर आमच्या आई-वडिलांनी किंवा वडीलधाऱ्यांनी ठेवलेली असतात. परंतु शिवाच्या प्रतिमेवरून हे स्पष्ट होते की शिवाला काही शरीर नाही, न त्यांचा दैहिक जन्म होतो, म्हणूनच तर त्यांना 'स्वयंभू' म्हटले जाते, 'शिव' हे नाव गुणवाचक, कर्तव्यवाचक किंवा परिचयवाचक आहे. त्याला आपण उदाहरणाद्वारे स्पष्ट करूया - 'महाराजा' शब्दाचा विचार करा, हा शब्द त्या व्यक्तिसाठी उपयोगात आणला जातो जो कुठल्या तरी देशाचा शासनकर्ता असेल, ज्याच्या अधिन काही जनता आणि कुठला तरी देश वा भुमी सुध्दा असेल. या वरून स्पष्ट होते की हा शब्द कर्तव्यवाचक किंवा सत्तावाचक आहे तसेच ही उपाधी सुध्दा असेल. अशाच प्रकारे 'शिव' शब्द सुध्दा कर्तव्याचा बोध करवणारा आहे. जो विश्वाचे कल्याण करणारा आहे, त्याचेच हे दिव्य अथवा आध्यात्मिक नाव 'शिव' आहे.

'कल्याण' या पासून कोणत्या प्रतिक्रीया मिळतात? मनुष्याला ज्या अवस्थेमध्ये न रोग व्हायला पाहिजे, न दु:ख असेल,न काळाने झडप घालून आघात होईल, न संकट असेल, न विक्षेप - त्याच्या त्या अवस्थेला 'कल्याणकारी अवस्था' म्हटले जाते. आता यावरून स्पष्ट होते की, जो स्वयं कल्याण स्वरूप आहे आणि कल्याण करणारा आहे तो स्वत: अवश्य रोग, शोक व दु:ख-अशांती पासून नेहमीसाठी वेगळा असेल आणि आनंदाचा सागर तसेच सर्व शक्तिवान असेल, तेव्हाच तर तो सम्पूर्ण विश्वाला सुख व शांती देत असेल आणि इतरांचे संकटे

व कष्टांचे हरण करणारा असू शकेल. मग, तो ज्ञानस्वरूप व परिपूर्ण सुध्दा असु शकेल कारण सर्व काही जाणनाराच तर कल्याणाचे कर्तव्य करू शकतो. या वरुन स्पष्ट आहे की 'शिव' परमपिता परमात्म्याचे दिव्य नाव आहे कारण की परमात्माच ज्ञानाचा सागर, शांतीचा सागर, आनंदाचा सागर आणि सर्व शक्तिवान आहे. परंतू बघा किती आश्चर्याची गोष्ट आहे की, आज लोक म्हणतात की, परमात्म्याचे काही ही नाव नाही. जो सगळयात जास्त नावे असणारा आहे, त्याला नावाने सुध्दा न मानने हा कसला वेंधळेपणा असेल! ज्याची निशानी (शिवलिंगाच्या रूपामध्ये स्मरण-चिन्ह) आहे त्याचे रूप तर अवश्य असणारच कारण कुठल्या वस्तुचे नाव-निशानी न मानणे म्हणजे त्याचे अस्तित्व न मानल्या सारखे आहे. हां, ज्यांच्या मनामध्ये परमात्म्याची स्मृती नाही, आठवण नाही त्यांच्या दृष्टीने तर परमात्म्याचे काही नाव निशान नाही, कारण आपण पाहतो की व्यवहारामध्ये कोणी मित्र- सबंधी कोणत्या व्यक्तिला विसरतो तर ती व्यक्ति खोचक रूपाने म्हणेल की - 'आपल्या लिस्ट मध्ये तर आमचे नावच नाही.' सांगण्याचा भाव हा आहे की आपण तर आमची आठवण किंवा आमचे नाव सुध्दा काढत नाही. समजा कुणाचे स्मृतीचिन्ह, फोटो इत्यादी आपल्या जवळ ठेऊन आणि त्याला कांही प्रसंगावेळी बोलवले किंवा आठवले नाही तर तो उपेक्षेने म्हणेल - 'अहो, आपल्या जवळ तर आमचा पत्ता-निशानी सुध्दा नाही. आपण तर आमचे नामो-निशान सुध्दा पुसून टाकलेले आहे!' या म्हणण्याला किंवा बोलण्याच्या पध्दतीला असे म्हणावे लागेल की परमात्म्याचे नाव रूप आहे खरे, परंतु आज लोकांच्या मध्ये स्मृती नाही, त्याच्या प्रती आता पूर्वी सारखी श्रध्दा नाही आणि त्यांनी परमात्म्याला विसरल्यासारखे केले आहे, जवळ-जवळ विसरला आहे म्हणण्यास हरकत नाही. याच अर्थाने सांगितले असेल की त्याचे काही नाव नाही, म्हणजे वास्तवीक ओळखी नुसार काही नाव नाही. व्यवहारामध्ये पण जेव्हा आम्ही कोणाशी असे म्हणतो की,- 'आपल्या जवळ तर बहुतेक आमचे नाव आणि पत्ता सुध्दा नसेल.' तर याचा भाव हाच असतो की तुम्ही आम्हाला बोलवत नाही आणि आमची आठवण सुध्दा करत नाही, पत्र वगेरे सुध्दा लिहीत नाही. समजा यथार्थ दृष्टीने पाहिले तर परमात्म्याचे सर्वात श्रेष्ठ आणि ' प्रात: स्मरणीय' नाव आहे, परंतु आज लोकांनी त्याला विसरले आहे. शिवलिंग वास्तवीक शिवाचेच स्मरण-चिन्ह आहे. शिवलिंगाचा जो आकार आहे त्याच्यावरून हे स्पष्ट होते की, कुठल्याही देहधारीची किंवा मनुष्य वा देवी-देवताची प्रतिमा नाही, परंतु ज्योतिस्वरूप परमात्म्याची यादगार आहे. कारण एकच परमात्मा जो असा आहे की त्याला आपले पाच तत्वाचे शरीर नाही. इतर सर्व देवी-देवता तर स्थूल व प्रकाशमय देहधारी आहेत. बहुतेक लोक सांगतात की - 'परमात्म्याचे कोणतेही रूप नाही!' परंतु विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, समजा परमात्म्याला कोणतेही रूप नाही तर भक्त त्याच्या दर्शनाची इच्छा का बाळगतात, लोक त्याच्या साक्षात्कारासाठी का उत्सुक आहेत आणि त्याच्या दिव्य प्रत्यक्षतेसाठी 'काशी-कलवट' साठी का तयार होतात ? व्यवहारीक क्षेत्रामध्ये वास्तवीक असे होत नाही की घरामध्ये वडीलांचा फोटो लावलेला आहे आणि मुलगा म्हणतो की - ' माहीत नाही कुणाचा फोटो आहे.' असे तर कोणी अनाथच म्हणू शकेल. कोणताही मुलगा कधीच असे म्हणणार नाही की - ' माझ्या वडीलांचे नाव पण नाही आणि रूप पण नाही.' हा, समजा लहानपणा पासून जर एखादी मुलगा आपल्या वडीलां पासून वंचीत असेल तर कदाचीत असे सुध्दा म्हणू शकेल. परंतु आज किती आश्चर्याची गोष्ट आहे की मनुष्य सांगतात की आमच्या परमपित्याचे (परमात्म्याचे) काही नाव-रूप नाही! तेव्हा महाशिवरात्री चे वास्तविक आध्यात्मिक रहस्य जाणून घेणे आजच्या काळात अत्यंत महत्वाचे आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com